महाराष्ट्र शासन
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
३, महापालिकामार्ग,टपालपेटी क्रमांक१००३६, मुंबई४०० ००१.
WWW.DVET.GOV.IN e-mail:desk8@dvet.gov.in Phone No.22620603/604

क्रमांक:-८/ऑनलाईन मान्यता /सुचना /२०२०/१०३
दिनांक : १४/०६/२०२०

## सुचना

- सर्व संबंधितांना कळविण्यात येते की,सन २०२०-२१ करीता माध्यमिक स्तरावरील पुर्व व्यावसायिक व +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नविन व्यवसाय /जादा तुकड्या कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरीता रजिस्ट्रेशन व ऑनलाईन अर्ज करण्याची तसेच नोंदणी केलेल्या संस्थांची निरीक्षणाकरीता ऑनलाईन विनंती करण्याची सुविधा vti.dvet.gov.in या वेब पोर्टलवर बंद करण्यात येत आहे.
- तसेच नविन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे आणि विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नविन व्यवसाय /जादा तुकड्या कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरीता रजिस्ट्रेशन व ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा vti.dvet.gov.in या वेब पोर्टलवर बंद करण्यात येत आहे.
- २०२१-२२ करीता मान्यता कार्यक्रम vti.dvet.gov.in या वेब पोर्टलवर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.
- ज्या पुर्व व्यावसायिक व +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या संस्थांनी यापुर्वी vti.dvet.gov.in या वेब पोर्टलवर नोंदणी करुन संपुर्ण माहिती व आवश्यक शुल्क भरुन निरीक्षणाकरीता ऑनलाईन विनंती केलेली आहे अश्या संस्थांचे संचालनालयामार्फत निरीक्षण करुन अंतिम मान्यतेकरीता प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतील.शासनाची मान्यता प्राप्त झाल्याशिवाय संस्थांना नवीन अभ्यासक्रम/तुकडयांना प्रवेश करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.
- ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी यापुर्वी vti.dvet.gov.in या वेब पोर्टलवर नोंदणी करुन संपुर्ण माहिती व आवश्यक शुल्क भरलेले आहे अश्या संस्थांचे अंतिम मान्यतेकरीता प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतील.शासनाची व डीजीटी,नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त झाल्याशिवाय संस्थांना नवीन अभ्यासक्रम/तुकडयांना प्रवेश करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सी.ए.निनाळे**

**सहसंचालक**

H:\Letter to Govt 2020.docx